# एयूसीएलची व्हॉट नॉवसोबत भागीदारी

**मुंबई** : एयूकॉर्पोरेट ॲडवायजरी ॲंड लीगल सर्व्हिसेज (एयूसीएल)ने मुख्य पथदर्शक उपक्रमासाठी व्हॉट नॉवसोबत भागीदारी केली आहे. याप्रसंगी एयूकॉर्पोरेट ॲडवायजरी ॲंड लीगल सर्व्हिसेजचे संस्थापक अक्षत खेतान म्हणाले की, सायबर गुंडगिरी, सायबर गुन्हे आणि सायबर छळामुळे उद्‌भवणाऱ्या जोखमींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. एक सर्वसमावेशक कायदेशीर चौकट तयार करून, जागरूकता वाढवून आणि कायद्याची अंमलबजावणी बळकट करून, भारत या ऑनलाइन धोक्यांचे हानिकारक परिणाम कमी करू शकतो.